# प्रसिद्धीपत्रक

## मार्च २०१७ मध्ये होणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या सुधारणेबाबत शिक्षक व पालकांसाठी प्रश्नावली

शासन निर्णय क्र: एफईडी-४०१४/६४३/प्र.क्र.४/एसडी-५ दि. २९ जून २०१५ नुसार पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा सन २०१६-१७ मध्ये इयत्ता ४थी, ७वी ऐवजी इयत्ता ५वी, ८वी मध्ये घेण्यात येणार आहे. तसेच या योजनेचे नामाभिधान **उच्च प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती योजना** असे करण्यात आले आहे.

आत्तापर्यंत इ. ४थी व ७वी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पुढील विषयांचे समावेश होता.

| अ.क्र. | पेपर | इयत्ता ४थी | इयत्ता ७वी |
|---|---|---|---|
| १ | पेपर १ | भाषा व इंग्रजी<br>गुण ७० व ३० | भाषा व इंग्रजी<br>गुण ८० व २० |
| २ | पेपर २ | गणित व परिसर अभ्यास भाग १<br>गुण ७० व ३० | गणित व सामाजिक शास्त्रे<br>गुण ७० व ३० |
| ३ | पेपर ३ | बुद्धिमत्ता चाचणी व परिसर अभ्यास भाग २<br>गुण ७० व ३० | बुद्धिमत्ता चाचणी व सामान्य विज्ञान<br>गुण ७० व ३० |

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून शिष्यवृत्ती परीक्षेत कोणत्या विषयांचा समावेश करणे अपेक्षित आहे, विषयांची संख्या, प्रश्नपत्रिकांसाठी लागणारा वेळ, विद्यार्थ्यांचा स्तर, या शिवाय शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये नेमके कोणते बदल हवेत? यासाठी शिक्षक/पालक यांचे मत जाणून घेणे महत्वाचे आहे. त्यासाठी पुढील प्रश्नावलीच्या आधारे शिक्षक/पालकांनी कृपया आपले अभिप्राय परिषदेस कळवावेत. असे आवाहन करण्यात येत आहे. याबाबत कृपया पुढील सूचना लक्षात घ्याव्यात.

१) प्रसिद्धीपत्रक व प्रश्नावलीची परिषदेच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट काढावी.

२) आपल्या अभिप्रायाची प्रश्नावली भरुन परिषदेकडे गुरुवार दि. १५ ऑक्टोबर २०१५ अखेर पर्यंत टपालाने किंवा ईमेलद्वारे (msshss.msce@gmail.com) पाठवावी.

३) विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अभिप्रायांचा मार्च २०१७ मध्ये होणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विचार केला जाईल.

आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०१.

**ठिकाण - पुणे**
**दिनांक ०८/०९/२०१५**

# शिक्षक/पालकांसाठी प्रश्नावली

दिनांक - / /२०१५

- संपूर्ण नाव - ----------------------------------------------------------------
- पद - ----------------------------------------------------------------
- शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मार्गदर्शनाचा अनुभव (शिक्षकांसाठी फक्त) - ----------------------------------------------------------------
- शाळेचे नाव - ----------------------------------------------------------------
- पत्ता - ----------------------------------------------------------------
- मोबाईल क्रमांक - ----------------------------------------------------------------
- ईमेल आयडी - ----------------------------------------------------------------

प्रश्न क्र. १) **मार्च २०१७ मध्ये होणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेत कोणत्या विषयांचा समावेश असावा? (चौकटीत उत्तरादाखल बरोबर ✔ किंवा चूक ✖ खूण करा.)**

पेपर १ - अ) भाषा व इंग्रजी ☐ ब) फक्त भाषा ☐

पेपर २ - अ) गणित व परिसर अभ्यास भाग १ (MSS) ☐ ब) फक्त गणित ☐

गणित व सामाजिक शास्त्रे (HSS)

पेपर ३ - अ) बुद्धिमत्ता चाचणी व परिसर अभ्यास भाग२ (MSS) ☐ ब) फक्त बुद्धिमत्ता चाचणी ☐

बुद्धिमत्ता चाचणी व सामान्य विज्ञान (HSS)

प्रश्न क्र. २) **वरील प्रश्नाच्या उत्तराच्या समर्थनार्थ तुमचे उत्तर होय असल्यास किंवा नसल्यास कारणे द्यावीत.**

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

प्रश्न क्र. ३) शिष्यवृत्ती परीक्षा खालीलपैकी कोणत्या स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात यावी असे तुम्हास वाटते? (योग्य पर्यायापुढे बरोबरची खूण करावी.)

अ) अतिप्रगत ☐

ब) प्रगत ☐

क) सर्व ☐

प्रश्न क्र. ४) शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ३ ऐवजी दोन पेपर्स ठेवून त्यांना प्रत्येकी ९० मिनिटांचा कालावधी ठेवावा का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

प्रश्न क्र. ५) शिष्यवृत्ती परीक्षेत प्रत्येक पेपरसाठी १ तास वेळ दिला जातो. तसेच प्रत्येक पेपरनंतर प्रत्येकी १ तास मध्यंतरासाठी असतो. त्यामुळे परीक्षेदिवशी विद्यार्थी एकंदरीत ५ तास तणावाखाली असतो, अशा पालकांच्या बारंवार तक्रारी येत आहेत.

त्यामुळे सलग तिन्ही पेपर्सचा एकाच पेपरमध्ये समावेश करुन परीक्षा घेतल्यास विद्यार्थी तीन तासात १५० प्रश्न सोडवू शकतील. विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करुन १५० प्रश्नांची एकच प्रश्नपत्रिका ठेवावी. असा बदल करणे योग्य आहे की अयोग्य याबद्दल तुमचे मत मांडा.

अ) योग्य ☐ ब) अयोग्य ☐

कारण - ------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

प्रश्न क्र. ६) याशिवाय शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये नेमके कोणते बदल हवेत? (कृपया थोडक्यात नोंदवावेत)

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

स्वाक्षरी